महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१
e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र क्रमांकः नाविमं / पमा / 3303
नागपूर, दिनांक – १७/१०/२०२४

प्रति,

मा. संचालक,
माहिती व जनसंपर्क कार्यालय,
नागपूर विभाग, नागपूर

विषयः– फेब्रुवारी / मार्च– २०२५ मध्ये आयोजित करावयाच्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षांची वेळापत्रके अनाधिकृत संकेतस्थळावरून जाहीर करण्यात आली असलेबाबत.

संदर्भः– राज्य मंडळाचे पत्र व प्रकटन क्र. रा.मं./परीक्षा–६/४१२९, दि.–१६/१०/२०२४.

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, मंडळामार्फत घेण्यात येणा–या फेब्रुवारी / मार्च– २०२५ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा आयोजित करावयाच्या तारखांबाबत काही अनाधिकृत संकेतस्थळावरून परीक्षेची वेळापत्रके जाहीर करण्यात असल्याबाबतचे प्रकटन सोबत जोडलेले आहे.

तरी सदर प्रकटनास आपण आपल्या कार्यकक्षेतील सर्व वृत्तपत्र, वृत्तवाहिन्या, आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रांनी बातम्यांचे वेळी विनामुल्य तात्काळ, प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

सहपत्रः–प्रकटनाची प्रत

1) प्रति, सचिव महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा, शिवाजीनगर,पुणे–4 यांना माहितीस्तव समादराने अग्रेषित.
2) प्रति, शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग नागपूर यांना समादराने अग्रेषित.
3) प्रति, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. प. भंडारा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील माध्यमिक शाळा यांच्या लेखी निदर्शनास आणून द्यावे.
4) प्रति, मा. संचालक, आकाशवाणी केंद्र नागपूर, यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या आकाशवाणी केंद्रावरुन बातम्याचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
5) प्रति, मा. संचालक, दूरदर्शन केंद्र नागपूर, यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या दूरदर्शन केंद्रावरुन बातम्याचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
6) मा. संपादक, दै.........................................................यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या वृत्तपत्रातून तात्काळ विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
7) मुख्याध्यापक / प्राचार्य, सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, नागपूर विभाग, नागपूर यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनानुसार कार्यवाही करावी.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

**विषय– उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) फेब्रु–मार्च २०२५ लेखी परीक्षांच्या वेळापत्रकाबाबत...**

## ।। प्र क ट न ।।

---

फेब्रु–मार्च २०२५ मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छ.संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) लेखी परीक्षांच्या संभाव्य तारखांबाबत सूचना, हरकती मागविण्यात आल्या होत्या.

तथापि काही संकेतस्थळावरून फेब्रुवारी--मार्च २०२५ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या परीक्षांची वेळापत्रके जाहीर करण्यात आली असल्याबाबतची बातमी सोशल मिडीयामार्फत प्रसारित करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे.

त्याअनुषंगाने या प्रकटनाव्दारे जाहीर करण्यात येते की, फेब्रुवारी--मार्च २०२५ च्या आयोजित करण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) लेखी परीक्षेची सविस्तर वेळापत्रके मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर अद्याप प्रसिध्द करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे सोशल मिडीयावरून प्रसिध्द करण्यात आलेली फेब्रुवारी–मार्च २०२५ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) लेखी परीक्षेची वेळापत्रके ग्राहय धरण्यात येवू नयेत.

फेब्रुवारी–मार्च २०२५ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या इ.१२वी व इ.१०वी परीक्षांची सविस्तर विषयनिहाय वेळापत्रके स्वतंत्रपणे मंडळाच्या www.mahahsscboard.in या अधिकृत संकेतस्थळावर_यथावकाश जाहीर करण्यात येतील, याची सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक व अन्य घटक यांनी नोंद घ्यावी.

तसेच मंडळाचा लोगो अथवा नावाचा वापर करून परीक्षेबाबत चुकीची माहिती प्रसारित करून पालक, शिक्षक, विद्यार्थी यांचेमध्ये संभ्रम निर्माण केल्यास त्या विरोधात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल.

**दिनांक :** १६. १०.२०२४

(अनुराधा ओक)<br>सचिव,<br>राज्यमंडळ, पुणे ४.